# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
दूरध्वनी क्र-022-28192828 ई-मेल आयडी- gad@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/ सा.प्र./१६४ /2024-25 दि. १० /०६/2024

**विषय :-** वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरणपत्र तयार करणेबाबत.

**संदर्भ :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९४ अन्वये वार्षिक प्रशासन अहवाल आणि लेख विवरणपत्र तयार करुन मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या मंजुरीकरिता सादर तयार करणेबाबत.

**परिपत्रक**

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार मागील सरकारी वर्षातील महानगरपालिकेच्या प्रशासन संबंधी तपशिलवार अहवाल सादर करणे आवश्यक आहे. तसेच उक्त वर्षात महानगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व संवितरीत केलेल्या रक्कमा व अशा वर्षाच्या अखेरिस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शविणाऱ्या विवरणपत्रासह तयार करुन मा. आयुक्त तथा प्रशासकाकडे सादर करावयाची आहे.

उक्त संदर्भात आपल्या विभागाशी निगडीत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात आपल्या विभागामार्फत खालीलप्रमाणे केलेल्या कार्यवाहीची परिपुर्ण माहिती हे पत्र प्राप्त होताच ३ दिवसांत सामान्य प्रशासन विभागात Hard Copy व नाविन्यता कक्षच्या innovationcell@mbmc.gov.in या मेल आयडीवर Mangal font (unicode) मध्ये Soft copy (word file) जमा करावी.

१. कर्मचाऱ्यांची पदनिहाय संख्या

२. कामाचे स्वरुप

३. अंदाजपत्रकिय तरतूद व खर्च

४. सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात विभागाने केलेली उल्लेखनीय कामगिरी

ह्याबाबत दिरंगाई, विलंब होणार नाही. याची विभागप्रमुख/ खातेप्रमुख यांनी सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

**(संजय दोंदे)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**
**सर्व विभागप्रमख / खातेप्रमुख**